<u>केंद्र शासन पुरस्कृत अमृत अभियान</u>- चंद्रपूर शहरातील प्रक्रियायुक्त सांडपाणी पुनर्चक्रीकरण व पुनर्वापर प्रकल्प महाराष्ट्र राज्य विद्युत निर्मिती कंपनीमार्फत राबविण्याबाबत.

महाराष्ट्र शासन

नगर विकास विभाग

शासन निर्णय क्रमांकः अमृत-२०१९/प्र.क्र.२२३/नवि-३३

मंत्रालय, मुंबई-४०० ०३२

दिनांक : १६ ऑगस्ट, २०१९

<u>संदर्भ</u> :-

१) शासन निर्णय नगर विकास विभाग क्र.अमृत-२०१५/प्र.क्र.१९७/नवि-३३, दिनांक १३ ऑक्टोबर, २०१५.

२) शासन परिपत्रक नगर विकास विभाग क्र. अमृत-२०१६/प्र.क्र.१६३/नवि-३३, दिनांक १६ मे, २०१६ व १२ जुलै, २०१६.

३) शासन निर्णय क्रमांक अमृत-२०१८/प्र.क्र.१२८/नवि-३३, दिनांक २६ मार्च, २०१८.

४) उद्योग उर्जा व कामगार विभागाचे पत्र क्रमांक संकीर्ण-२१९/प्र.क्र.१४९/उर्जा-४, दिनांक ०६ ऑगस्ट, २०१९ व त्यासोबतचे कार्यवृत्त.

<u>प्रस्तावना</u> :-

केंद्र शासन पुरस्कृत अमृत अभियानाची अंमलबजावणी संदर्भाधीन शासन निर्णयान्वये राज्यामध्ये सन २०१५-१६ वर्षापासून करण्यात येत आहे. सदर अभियानांतर्गत पाणी पुरवठा, मलनिस्सारण, पर्जन्यजलवाहिनी, नागरी परिवहन व हरित क्षेत्र विकास इ. पायाभूत सुविधांची निर्मिती अभियान शहरांमध्ये करण्यात येणार आहे. त्यानुसार सदर अभियानांतर्गत सन २०१७-१८ या आर्थिक वर्षामध्ये राज्याच्या रुपये २४८९.९१ कोटी किंमतीच्या आराखड्यास केंद्र शासनाने मान्यता दिलेली असून सदर आराखड्यामध्ये चंद्रपूर शहरातील प्रक्रियायुक्त सांडपाणी पुनर्चक्रीकरण व पुनर्वापर प्रकल्पाचा समावेश आहे.

२. अमृत अभियानांतर्गत समाविष्ट असलेल्या चंद्रपूर शहराच्या प्रक्रियायुक्त सांडपाणी पुनर्चक्रीकरण व पुनर्वापर प्रकल्पास समक्रमांकाच्या दिनांक २६ मार्च, २०१८ च्या शासन निर्णयान्वये प्रशासकीय मान्यता देण्यात आली आहे. तद्‌नंतर मा. मुख्य सचिव महोदयांच्या अध्यक्षतेखाली दिनांक ०५ जुलै, २०१९ रोजी ऊर्जा विभागासमवेत झालेल्या बैठकीत हा प्रकल्प महा निर्मिती कंपनीमार्फत पूर्ण ठेव तत्त्वावर राबविण्याचा निर्णय घेण्यात आला होता. त्याबाबतचे कार्यवृत्त उर्जा विभागाने संदर्भाकिंत दिनांक ०६ ऑगस्ट, २०१९ च्या पत्राद्वारे पाठविले आहे. त्या अनुषंगाने प्रशासकीय मान्यतेत सुधारणा करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

<u>शासन निर्णय</u> :-

केंद्र शासन पुरस्कृत अमृत अभियानांतर्गत राज्य वार्षिक कृती आराखड्यात समाविष्ट असलेल्या चंद्रपूर शहराच्या प्रक्रियायुक्त सांडपाणी पुनर्चक्रीकरण व पुनर्वापर प्रकल्पास समक्रमांकाच्या दिनांक २६ मार्च, २०१८ च्या शासन निर्णयान्वये दिलेल्या प्रशासकीय मंजुरीमध्ये उपरोक्त संदर्भ अ.क्र. ४ च्या अनुषंगाने खालीलप्रमाणे सुधारणा करण्यात येत आहे :-

१) सदर प्रकल्पासाठी कार्यान्वयन यंत्रणा महाराष्ट्र राज्य विद्युत निर्मिती कंपनी राहील. सदर प्रकल्पाचे कार्यान्वयन महाराष्ट्र राज्य विद्युत निर्मिती कंपनीमार्फत ठेव तत्त्वावर (Deposit Basis) करण्यात यावे.

२) या प्रकल्पाच्या अनुषंगाने प्रकल्पाचा वित्तीय आकृतीबंध समक्रमांकाच्या दिनांक २६ मार्च, २०१८ च्या शासन निर्णयातील परिच्छेद क्र. ३ प्रमाणे कायम राहील. त्यापैकी केंद्र व राज्य शासनाचे अनुदान नगर विकास विभागामार्फत महानिर्मिती कंपनीस उपलब्ध करुन देण्यात येईल व नागरी स्थानिक स्वराज्य संस्थेच्या हिश्श्याची रक्कम चंद्रपूर महानगरपालिकेमार्फत महाराष्ट्र विद्युत निर्मिती कंपनीस उपलब्ध करुन देण्यात येईल.

३) सदर प्रकल्पाची या पुढील अंमलबजावणी पूर्ण ठेव तत्त्वावर महाराष्ट्र राज्य विद्युत निर्मिती कंपनीमार्फत करण्याचा निर्णय झालेला असल्यामुळे या शासन निर्णयाच्या अनुषंगाने यासंदर्भातील सविस्तर प्रकल्प अहवाल व इतर सर्व कागदपत्रे चंद्रपूर महानगरपालिकेने महाराष्ट्र राज्य विद्युत निर्मिती कंपनीकडे सुपूर्द करावेत.

४) सदर कागदपत्रांच्या आधारे व या शासन निर्णयाच्या आधारे सदर प्रकल्पाबाबतची निविदा प्रक्रिया व अंमलबजावणीबाबतची संपूर्ण कार्यवाही महाराष्ट्र राज्य विद्युत निर्मिती कंपनीमार्फत करण्यात यावी.

५) सदर प्रकल्पासाठी याबाबतच्या समक्रमांकाच्या दिनांक २६ मार्च, २०१८ च्या शासन निर्णयाच्या परिच्छेद क्र.३ मध्ये नमूद केल्यानुसार रुपये ७८.९३ कोटीच्या मर्यादेत केंद्र, राज्य व नागरी स्थानिक स्वराज्य संस्थेचा हिस्सा महानिर्मिती कंपनीस उपलब्ध करुन देण्यात येईल.

६) या प्रकल्पाबाबतच्या इतर सर्व बाबी समक्रमांकाच्या दिनांक २६ मार्च, २०१८ च्या शासन निर्णयानुसार राहील.

२. हा शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१९०८१६१७०५०३४७२५ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

Pandurang Jotiba Jadhav

Digitally signed by Pandurang Jotiba Jadhav
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Urban Development Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=300d785e12fdc19db0612f1ffdf83e54efe7da2b1bc63d18df8e09b3c7eece65, cn=Pandurang Jotiba Jadhav
Date: 2019.08.16 18:14:04 +05'30'

(पां. जो. जाधव)
सह सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत :-

१. मा. मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव, मंत्रालय, मुंबई.
२. मा. मंत्री (पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग) यांचे खाजगी सचिव
३. मा. राज्यमंत्री (नगर विकास) यांचे खाजगी सचिव
४. मा. मुख्य सचिव, मंत्रालय, मुंबई.
५. अपर मुख्य सचिव, वित्त विभाग मंत्रालय, मुंबई.
६. अपर मुख्य सचिव, नियोजन विभाग मंत्रालय, मुंबई.

७. प्रधान सचिव, पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग यांचे स्वीय सहायक, मंत्रालय, मुंबई.
८. प्रधान सचिव नगर विकास विभाग (२) यांचे स्वीय सहायक, मंत्रालय, मुंबई.
९. सदस्य सचिव, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, मुंबई.
१०. आयुक्त तथा संचालक, नगरपरिषद प्रशासन संचालनालय, वरळी, मुंबई.
११. विभागीय आयुक्त, नागपूर विभाग, नागपूर.
१२. जिल्हाधिकारी, चंद्रपूर.
१३. जिल्हा प्रशासन अधिकारी, चंद्रपूर.
१४. आयुक्त, चंद्रपूर महानगरपालिका, चंद्रपूर.
१५. अभियान संचालक, स्वच्छ महाराष्ट्र अभियान, मुंबई
१६. अधिक्षक अभियंता, मध्यवर्ती नियोजन संकल्पचित्र व सनियंत्रण, मजीप्रा, ठाणे.
१७. निवडनस्ती, (नवि-३३).

*****